Please Consider the Environment Before Printing…

**Date: 25/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचाच्या, आतल्या वाचाच्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## महान चित्रकार पाब्लो पिकासो



पाब्लो पिकासो हे विसाव्या शतकातील महान चित्रकार होते आणि शिल्पकार होते. ते चित्रकलेतील त्यांच्या अभिनव शैलीसाठी आणि अनन्यसाधारण विचारांसाठी प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म २५ ऑक्टोबर १८८१ रोजी स्पेनमधील मलागा गावी झाला. सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बदल आणि चढ-उतार, खळबळ, गुंतागुंत आणि परस्परविरोधी प्रवाहावर आपल्याच चित्रांद्वारे भाष्य करणारे ते चित्रकार होते. अभिनव शैलीच्या या चित्रकाराने 'क्युबिझम' ही नवी चित्रशैली विकसित केली. पिकासो यांचे वडील जोसे रुईथ ब्लॉस्को हे चित्रकार होते व चित्रकलेचे शिक्षक होते. वडिलांनी त्यांना चित्रकलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण दिलं. १९०० साली ते पॅरिसमध्ये आले आणि चित्रकार म्हणून नावारुपालाही आले. पिकासो यांची 'सिटेड वुमन', 'दि कार्ड प्लेयर', 'नाईट फिशिंग', 'थ्री डान्सर्स', 'सिडने वुमन विथ फॅन्स' आदी अनेक चित्रे विलक्षण गाजली.

त्यांना प्रयोगशीलता, तंत्रशुद्धता आणि मानवतावादी संदेश यामुळे भरपूर प्रसिद्धी आणि यश मिळाले. दुसऱ्या महायुद्धाच्या संपूर्ण काळात पिकासो पॅरिसमध्ये होते. पॅरिसच्या मुक्ततेनंतर त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. त्यांच्या चित्रांवर व प्रदर्शनावर नाझींनी बंदी घातली होती. त्या काळात त्यांनी अनेक स्थिर चित्र, निसर्ग चित्रे काढली. तसेच अनेक शिल्पकृती तयार केल्या. सिरॅमिक्स आणि माती कामातूनही त्यांनी काही कलाकृती निर्माण केल्या. अगदी कोरोना काळात १३ मे २०२१ रोजी न्यूयॉर्कमध्ये झालेल्या चित्राच्या लिलावात त्यांचे 'वुमन सिटींग नियर ए विंडो' हे चित्र तब्बल ७५५ कोटी रुपयांना विकले गेले. त्यांची पाचहून अधिक चित्रे हजारो कोटी रुपयांना विकली गेलेली आहेत. अशा या थोर कलावंताचे ८ एप्रिल १९७३ रोजी फ्रान्समधील मॉगिन्स गावी निधन झाले.

Nashik Edition
Oct 25, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401